सन २०१९-२० करिता राज्य योजनेतंर्गत "संशोधन केंद्र आणि प्रायोगिक चाचण्या व क्षेत्रविषयक चाचण्या" (४४१५ ००११) या योजनेचा चालू बाब प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : एफडीएम-२०१९/प्र.क्र.४७ /फ-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १४ मे, २०१९

संदर्भ :- १) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.५३/(१९-२०)/११९, दि.०६.०५.२०१९.
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०१.०४.२०१९.
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र.बीयुडी-२०१९/४४१५/प्र.क्र.६४/ब-१, दि.०१.०४.२०१९.

प्रस्तावना :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य नागपूर यांनी त्यांच्या संदर्भाधीन क्र.१ येथील दि.०६.०५.२०१९ रोजीच्या प्रस्तावान्वये “संशोधन केंद्र आणि प्रायोगिक चाचण्या व क्षेत्रविषयक चाचण्या (४४१५ ००११)” या योजनेंतर्गत रु.५०.०० लक्षचा चालु बाब प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

राज्य योजनेअंतर्गत सन २०१९-२० करीता “संशोधन केंद्र आणि प्रायोगिक चाचण्या व क्षेत्रविषयक चाचण्या (४४१५ ००११)” या योजनेसाठी एकूण रु.५०.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. माहे एप्रिल, २०१९ ते जुलै, २०१९ या चार महिन्यांचा खर्च भागविण्यासाठी विधानमंडळाने महाराष्ट्र विनियोजन(लेखानुदान) विधेयक, २०१९ मंजूर केले असून त्यानुषंगाने वित्त विभागाचे परिपत्रक दि.०१.०४.२०१९ व या विभागाचा शासन निर्णय दि.१.०४.२०१९ अन्वये “संशोधन केंद्र आणि प्रायोगिक चाचण्या व क्षेत्रविषयक चाचण्या (४४१५ ००११)” या योजनेसाठी एकूण रु.१६.६६ लक्ष इतका निधी वितरणासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

३. त्या अनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी “संशोधन केंद्र आणि प्रायोगिक चाचण्या व क्षेत्रविषयक चाचण्या (४४१५ ००११)” या लेखाशीर्षाअंतर्गत सादर केलेल्या प्रस्तावास लेखानुदानाद्वारे उपलब्ध एकूण रु.१६.६६ लक्ष निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

४. प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपुर यांनी प्रस्तावित केल्यानुसार सन २०१९-२० करिता राज्य योजनेअंतर्गत “संशोधन केंद्र आणि प्रायोगिक चाचण्या व क्षेत्रविषयक चाचण्या (४४१५ ००११)” या योजनेंतर्गत **रु.१६.६६ लक्ष (०२, मजुरी-रु.१०.००**

लक्ष व २१ पुरवठा व सामग्री - रु.६.६६ लक्ष) इतका निधी वितरित व खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

५. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर निधी या विभागाकडून मंजूर केलेल्या प्रस्तावातील क्षेत्र / कार्यक्रम / कामे यावरच खर्च होईल व कामाची द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी असल्याची व त्याचबरोबर सध्या वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या संदर्भ क्र.२ वरील शासन परिपत्रकातील अटी व शर्तींची पूर्तता करण्यात येईल याची देखिल दक्षता घ्यावी.

६. सदर योजनेवर होणारा खर्च मागणी क्र. सी-१०, प्रधान शिर्ष - ४४१५, कृषि संशोधन व शिक्षण यावरील भांडवली खर्च, ०६ वनीकरण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनेतंर्गत योजना, ००४ संशोधन, (००)(०१) संशोधन केंद्र आणि प्रायोगिक चाचण्या व क्षेत्रविषयक चाचण्या (राज्य) (४४१५ ००११) या लेखा शिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यांत यावा.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक.०१.०४.२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये संबंधित प्रशासकीय विभागास लेखानुदानाद्वारे उपलब्ध निधीच्या मर्यादेत निधी वितरीत करण्यास प्राधिकृत करण्यात आले आहे. तसेच वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५१४१५३१४६७७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec,
serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2019.05.14 15:37:47 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रति :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.

४) मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.

५) मुख्य वनसंरक्षक (संशोधन), महाराष्ट्र राज्य, पुणे.

६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

७) सह सचिव / उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-३) / (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२.

८) उप सचिव, नियोजन विभाग (१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.

९) जिल्हा कोषागार अधिकारी नागपूर / पूणे

१०) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

११) निवडनस्ती , फ-२ कार्यासन,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.